Vol 6 Issue 5 June 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences,
University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 5 | June - 2016

Indian Streams Research Journal

# जळगाव जिल्ह्यातील कोळी समुदायाची शैक्षणिक, राजकीय आणि आर्थिक परिस्थिती

प्रा. वृषाली विलास कोल्हे
ए.डी.पी.एम.संचलित आर्टस, कॉमर्स व होम सायन्स महिला कॉलेज, जळगाव.





### प्रास्ताविक :

जळगाव जिल्हा तापी आणि गिरणा नद्यांच्या खोऱ्यांनी व्यापलेला प्रदेश आहे. पूर्वीपासूनच कोळी समाज आपल्या पारंपरिक व्यवसायाकरिता तापी व गिरणा आणि त्यांच्या उपनद्यांच्या काठांवर वस्ती करून रहात आहे. सन 1981 च्या जनगणनेत महादेव कोळी, मल्हारी कोळी, टोकरे कोळी या कोळी जातींची नोंद झाली आहे. कोळी ह्या मागासलेल्या जमातीत आधीपासूनच निरक्षरतेचे प्रमाण मोठे होते. शेती, शेतमजुरी, नावाडी, सालदारकी, मच्छीमारी, वन्यपदार्थ गोळा करणे असे व्यवसाय करणाऱ्या कोळी समुदायांची आर्थिक परिस्थिती साधारणच होती. राजकीय सत्तेतील त्यांचा सहभाग तर नगण्यच होता. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र शहरी आणि ग्रामीण भागात झालेल्या शिक्षणाच्या सुविधांमुळे कोळी समाज संक्रमणावस्थेत आला. त्यांच्या सामाजिक जीवनात अनेक बदल घडून आले आहेत. सामाजिक क्षेत्रात झालेले हे परिवर्तन आणि शैक्षणिक प्रगतीमुळे विवाह आणि कुटुंबसंस्थेच्या रचनेत बदल घडून आलेले आहेत. नविन व्यवसाय व उद्योगधंद्याच्या निमित्ताने समाजाचे शहरी भागात स्थलांतर झाले आहे. राजकीय सहभाग वाढला असून जाणिवापूर्ण समाज निर्मितीच्या प्रक्रियेमुळे धर्मश्रद्धा आणि कर्मकांड त्याज्य करून वैज्ञानिकतेची धारणा वाढीस लागली आहे.

### कोळी समुदायाची षैक्षणिक परिस्थिती :

कोळी समुदायाची गावाकडील व जळगाव शहरातील शैक्षणिक परिस्थिती पाहिली तर त्या समुदायातील शिक्षण व शैक्षणिक स्तर दयनीय स्वरुपाचा होता. परंतु आज परिस्थिती बदललेली दिसते. साक्षरतेचे प्रमाण वाढलेले दिसून येते. नोकरीच्या निमित्ताने बऱ्याचश्या व्यक्ती आपले गाव सोडून गेलेले आहेत.

ग्रामीण भागात पहिली ते चौथीपर्यंत मुले शाळेत जातात. पाचवीपासून ते हायस्कूलपर्यंत जाणाऱ्यांच्या संख्येत गळतीचे प्रमाण बरेच दिसते. जे पालक शिक्षणाविषयी जागृत आहेत ते आपल्या मुलांची शिक्षणाची सोय बाहेरगावी करतात किंवा ज्या मोठ्या गावात हायस्कूल आहे त्याठिकाणी मुलांची शिक्षणाची सोय करतात. मुले–मुली एस. टी. बसने ये–जा करतात. किंवा तालुक्याच्या गावाला होस्टेलमध्ये शिक्षणासाठी राहतात. त्यानंतर विशेषतः दहावी/बारावी पर्यंत शिकणाऱ्यांचे प्रमाण बरेच असले तरी पण त्यानंतर बारावी नंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलांची संख्या अतिशय अल्प दिसून येते. ज्या पालकांची आर्थिक परिस्थिती खूपच दयनीय आहे ते कामाच्या निमित्ताने बाहेरगावी आपल्या कुटुंबासह जातात. मुले सतत काम करीत असल्याकारणाने कधीही शाळेत जात नाहीत. कोळी समुदायाची मुले जेमतेम दहावी/बारावीपर्यंत शिकतात. दहावी/बारावीनंतर बहुसंख्य मुले–मुली नापास होवून जातात. गावाकडील व जळगाव शहरातील परिस्थिती सारखीच दिसून आली. त्यानंतर बहुतेक पालक मुलींच्या बाबतीत लग्नासाठी स्थळ शोधणे सुरू करतात व मुले कामधंदा शोधतात.[1]

शिक्षणाबद्दलच्या कमालीच्या उदासीनतेमुळे असलेल्या अंधश्रद्धा आणि रुढी परंपरांमुळे हा समुदाय मागासलेला आहे. शासनाने गावोगावी शाळा, महाविद्यालये सुरू केली आहेत. तरीही कोळी समुदायाचे शिक्षणाचे प्रमाण अपेक्षेप्रमाणे पाहिजे तितके दिसून येत नाही.

पहिली ते चौथीपर्यंत शाळेत मुलींना खिचडी भात मिळतो. तसेच मुलींना एक रुपया रोज शाळेत येण्याबद्दल दिला जातो. ही योजना राज्यसरकार जिल्हापरिषद माफत राबविते. इतके करूनही कोळी समुदायाचा शिक्षणाबद्दलचा दृष्टिकोण उदासिनतेचा आहे. याचे कारण त्यांची आर्थिक परिस्थिती अतिशय बिकट आहे.

कोळी समुदायाची शिक्षणाबद्दलची उदासिनता गावाकडील मुलांमध्ये तसेच जळगाव शहरातही दिसून येते. कोळी जमातीत मागासलेपणा आणि अशिक्षितपणामुळे अंधश्रद्धेचे प्रमाण अधिक होते. मानवी घटनांना देव कारणीभूत असल्याची त्यांची भावना होती. देवऋषीकडूनच उपाय करून घेतले जात कारण वैद्यकीय उपाय ह्या समाजात घोर पाप समजले जाई. देवावरच्या विश्वासामुळेच या जमातीत अंगात येण्याचे प्रमाणही जास्त होते. अंगात देव आणि भूत पिशाच्च येत असत. देव अंगात येणाऱ्या व्यक्तीला भगत म्हणून समाजात मानाचे स्थान होते. भगतामार्फतच भूत–पिशाच्च काढणे बरोबरच इतर उपचारही केले जात. भूत पिशाच्च बाधा होवू नये म्हणून भगत किंवा देवऋषींकडून गंडादोरा उपाय म्हणून केले जात. सर्पदंशावरही मांत्रिकाकडूनच उपाय केले जात.[2]

कोळी समुदायाचे लोक सरकारी नोकरीत कमी आढळून येतात. शैक्षणिकदृष्ट्या हा समुदाय मागासलेला आहे. शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला समुदाय असल्याकारणाने अगदी अल्पप्रमाणात सरकारी व निमसरकारी कार्यालयात नोकरीला आहेत. कुटुंबातील सर्वच लोक अनेक व्यवसायात गुंतलेले आहेत. उत्पन्न अत्यंत अल्प असल्याने आर्थिकदृष्ट्या हे लोक बरेचसे मागासलेले आहेत. अलिकडच्या काही वर्षात या समुदायातील तरुण पिढी धंद्याच्या बाबतीत, शैक्षणिक बाबतीत जागृत होत आहेत. पारंपरिक व्यवसायाशिवाय मिळेल तो छोटा व्यवसाय शेती, मजुरी, हे लोक करू लागले आहेत. शिक्षणाचे महत्त्व कळू लागल्यामुळे या कोळी समुदायातील काही कुटुंबातील लहान मुले शाळेत जावू लागली आहेत. परंतु शाळेतही त्यांचे प्रमाण अल्पांश आहे. कारण आर्थिक परिस्थिती गरिबीची असल्याने मिळेल ते काम करावे लागते. त्या कामाला मुले/मुली देखील लागतात किंवा आपल्या लहान भावंडाना सांभाळतात. या कारणामुळे या समुदायातील विद्यार्थ्यांमध्ये गळतीचे प्रमाण सर्वाधिक आहे.[3]

### *कोळी समुदायाचे राजकीय जीवन :*

पूर्वीच्या कोळी न्यायदान करण्यासाठी गावातील लोक पाच पंच निवडून देत असत. ते अनुभवी रहात असत. न्याय देण्याच्या ठिकाणालाच चावडी असे म्हणत असत. गुन्हेगाराला किंवा भांडण करणाऱ्यांना चावडीवर बोलविले जाई, असे कोळी समुदायातील वयस्कर लोक सांगतात. ही पद्धत कोळी समुदायात होती. पण आता काळानुसार बदल झालेला आहे. पूर्वीची न्यायदानाची पद्धत आज राहिलेली नाही.[4]

कोळी समुदायाच्या गावांमध्ये स्वतंत्र ग्रामपंचायती आहेत. त्यात कोळी समुदायाचे लोक राजकारणात सक्रिय सहभाग घेतात. ते ज्या ठिकाणी बहुसंख्येने आहेत अशा गावामध्ये तेच सरपंच /उपसरपंच आहेत व ग्रामपंचायतसदस्यही आहेत. त्यांच्यामध्ये (गावपातळीवर) निवडणुका जोरदार व अटीतटीच्या होतात.[5]

जळगाव शहरात कोळी समुदायाचे लोक जैनाबाद (वाल्मिकीनगर) येथे सर्वात जास्त वस्ती करून रहातात. म्हणून वाल्मिकीनगर येथे श्री. मिलिंद कोंडू सपकाळे हे सध्या नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. तसेच सुदगाव ता. रावेर येथे श्री. उमेश विनोद सपकाळे हे तंटामुक्तीचे अध्यक्ष आहेत. याचा अर्थ असा की, ज्या ठिकाणी कोळी वस्तीचे लोक जास्त त्या ठिकाणची बरीचशी राजकारणातील पदे या समुदायाकडे असतात.[6]

जळगाव जिल्ह्यात कोळी समुदायाचे, चोपडा तालुक्यातील आमदार श्री. चंद्रकांत बळीराम सोनवणे (2015–2020 पर्यंत) आहेत. तसेच धरणगाव तालुक्याचे मनसेचे अध्यक्ष श्री. भरत जगन्नाथ सैंदाणे हे आहेत. श्री. संजय भावसिंग शिरसाठ हे नालखेडा, ता. अमळनेर येथे पोलीस पाटील या पदावर कार्यरत आहेत. श्री. किशोर गोरख शिरसाठ हे नालखेडा, ता. अमळनेर याठिकाणी दक्षता समितीचे अध्यक्ष (राष्ट्रवादी काँग्रेस) आहेत. तसेच श्री. दिलीप काशिनाथ कोळी हे पंचायत समिती, जळगाव येथे माजी सभापती होते.[7]

कोळी समुदायाचे जिल्हा व तालुक्याच्या विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्थेच्या पातळीवरील राजकारणातही त्यांचा सहभाग असतो, असे दिसून येते.

गावपातळीवर विचार केला तर बऱ्याच गावांमध्ये कोळी समुदायाचे लोक सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत येथे शिपाई इत्यादी पदांवर कार्यरत आहेत. राखीव जागांचा राजकारणात या समाजाला फायदा झालेला दिसून येतो. म्हणजेच राजकीय क्षेत्रात कोळी लोकांचे वर्चस्व हळूहळू वाढत आहे. परंतु पूर्वीचा कोळी समुदाय आणि आधुनिक सुशिक्षित कोळी समुदाय यांच्यात कुठेतरी अंतर निर्माण होतांना दिसून येते. सर्वेक्षणात निवडलेल्या गावनिहाय पदाधिकाऱ्यांची माहिती दर्शविलेल्या तक्त्यावरून वरील गोष्टीची थोडीफार माहिती होते. या राजकीय लोकांमुळे कोळी समुदायाचा विकास हळूहळू होईल, असे दिसून येते.

संशोधनासाठी निवड केलेल्या गावांमध्ये एकंदरीत राजकारणात वा स्थानिक गावांच्या प्रशासनात त्यांचा प्रभाव कसा आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला. या दृष्टीने येथे असलेली महत्त्वाची व दुय्यम पदे कोणत्या समुदायाकडे आहेत हे पाहिले असता खालील चित्र वा परिस्थिती दिसून येते.[8]

**कोळी समुदायातील ग्रामपातळीवरील महत्त्वाच्या पदांवरील संख्या**

| अ. नं. | पद | संख्या |
|---|---|---|
| 1. | नगरसेवक | 01 |
| 2. | सरपंच | 06 |
| 3. | उपसरपंच | 05 |
| 4. | ग्रामपंचायत सदस्य | 12 |
| 5. | पोलीस पाटील | 03 |
| 6. | पंचायत शिपाई | 07 |

ग्रामपातळीवर वरील सर्व प्रमुख पदांवर विशेषतः सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, पंचायत शिपाई कोळी समुदायाचे दिसून येतात.

### आर्थिक जीवन :

कोळी समुदायाचा आर्थिक दृष्टिकोनातून विचार केला तर बहुतांशी लोक शेतीव्यवसायावर अवलंबून असतात. गावाकडील काही लोक शेतमजुरी करतात. काही अल्पभूधारक आहेत, तर काही व्यवसाय करतात. जळगाव शहरातील बरेचसे कोळी समुदायाचे लोक नोकरी, व्यवसाय, कामधंदा करतात, तर काही तरुण मुले दुकांनावर कामे करतात.

थोडक्यात कोळी समुदायाची आर्थिक बाब इतर लोकांपेक्षा वेगळी आहे असे म्हणता येणाार नाही. कारण इतर लोकांसारखेच काम करून आपला जीवन चरितार्थ भागविणे हेच त्यांचे मुख्य उद्दिष्ट दिसून येते. ज्या लोकांकडे शेती आहे त्यांनी स्वबळावर शेतीमध्ये प्रगती केलेली दिसून येते. तर काही लोकांनी शासनाने ज्या योजना राबविल्या त्याचा फायदा घेतल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांची शेतीमध्ये प्रगती झालेली आहे. काही लोकांची अल्पप्रमाणात कोरडवाहू असलेली शेती बागायती होण्यास मदत झालेली आहे. त्याचबरोबर दुय्यमव्यवसायही कोळी समुदायाचे लोक करीत असतात.[9]

### इतर व्यवसाय :

कोळी समुदायाचे काही लोक आर्थिकदृष्ट्या परावलंबी आहेत. काही लोकांजवळ जमिनी नाहीत ते बारमाही मजूरीचे काम करतात. तर ज्या लोकांकडे शेती आहे परंतु ती बहुतांशी कोरडवाहू आल्यामुळे त्यातून पाहिजे तसे उत्पादन येत नाही. म्हणून मजुरी करावीच लागते. बऱ्याचवेळा कर्जबाजारी व्हावे लागते. काही वेळेला पावसाळ्यामध्ये उपासमारीची सुद्धा वेळ काही लोकांवर येते.

काहींना बारमाही शेतीचे काम नसल्याकारणाने कोळी समुदाय इतर व्यवसाय करतात. उदा. तरुण मुले रिक्षा व प्रवासी टॅक्सी चालवितात, कापड दुकानावर काम करतात. बसस्टॅापवर पानटपरी चालवितात. उन्हाळ्यात उसाच्या रसाचे दुकान लावतात. तूमानानुसार व्यवसाय, कामधंदा करतात. जळगाव शहरातील लोकांना कुठेही रोजगार मिळत असतो.[10]

### रोजगारासाठी कोळी लोकांचे स्थलांतर :

गावाकडील कोळी समुदायाच्या गावाचा व तेथील लोकांचे ढोबळमानाने जे चित्र पहावयास मिळते ते खालीलप्रमाणे

1) शेती व्यवसाय करणारा समुदाय (सधन शेतकरी)
2) कोरडवाहू शेती करणारा समुदाय (अल्पभूधारक)
3) फक्त मजुरी करणारा समुदाय (मजूर)
4) इतर व्यवसाय करणारा समुदाय

गावनिहाय विचार करता ज्या कोळी लोकांकडे पुरेशी शेती नाही अशा लोकांना मजुरी करावी लागते. त्यांना बारमाही आपल्या गावात कामे मिळतीलच असे नाही. कोळी समुदायातील मजूरांना कामाच्या शोधात भटकंती करावी लागते. कोळी लोक फार कष्टाळू व मेहनती असतात. पावसाळ्यात त्यांना कामे मिळत नसल्याकारणाने ते कर्जबाजारी होऊन जातात. त्यांच्याजवळ थोडीफार शेती असेल तर ते शेतीचे काम हंगामापुरतेच असते. नंतर काहीच काम नसते.

काही कोळी समुदायातील लोक कामासाठी इतरत्र स्थलांतर करतात. उदा. शहरात नातेवाईकांमाफत कामे शोधतात. शहरात सेंट्रींग काम बरेच कोळी लोक करतांना दिसून येतात. तसेच मोठमोठ्या इमारती बांधकामावर, टेलिफोनच्या वायरी टाकण्यासाठी खड्डे खोदण्याच्या कामावर इत्यादी ठिकाणी त्यांना चांगली मजुरी मिळते. विशेष म्हणजे जळगाव शहरातील आजूबाजूच्या गावातील कोळी लोक वरील कामासाठी जातात. उन्हाळ्यात पाणी कमी असल्याकारणाने ही कामे काही ठिकाणी बंद पडतात. त्यामुळे त्यांना दुसरे काम शोधावे लागते.

वरील सर्व गोष्टीचा विचार केला तर कोळी लोकांचे जीवन हे आपल्या दैनंदिन गरजा व आर्थिक समस्या सोडविण्यासाठी, रोजगार मिळविण्यासाठी त्यांना इकडे तिकडे जावे लागते. नाही तर त्यांच्यावर उपासमारीची वेळ येते.

ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे ते याला अपवाद आहेत. तसेच जळगाव शहरात रहाणाऱ्या कोळी लोकांचीही परिस्थिती वेगळी आहे.[11]

### सध्याची आर्थिक परिस्थिती :

कोळी समुदायाची आर्थिक परिस्थिती ज्यांची चांगली आहे त्यांच्याकडे गावातील इतर समुदायाचे लोकही कामाला जातात. काही गावांमध्ये कोळी लोकांची आर्थिक परिस्थिती सधन आहे कारण बरेच कोळी समुदायाचे लोक शेतीला जोडधंदा म्हणून इतर व्यवसायही करतात. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. इतर समाजातील लोक काही कोळी लोकांकडे सालदार म्हणून काम करतात. कोळी लोकांकडे बागायत आणि कोरडवाहू दोन्ही प्रकारची शेती आहे. पावसाळा चांगला होत नसल्यामुळे शेतीला उत्पादन चांगले येत नसल्याचे खूपच वाईट वाटते, असे कोळी लोकांचे म्हणणे आहे. बरेचसे कोळी लोक आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे इतर गावाांमध्ये कामाला जातात. पावसाळ्यातही शेजारच्या गावात कामाला जातात. कारण शोधले असता शेजारील गावात मजूरी जास्त मिळते असे दिसून आले. विशेषतः पावसाळ्याच्या दिवसात स्त्रिया निंदायला शेजारच्या गावात जातात. काही गावांमध्ये भिल्ल आदिवासी कोळी लोकांकडे कामाला जास्त प्रमाणात असतात.[12]

कोळी लोकांच्या शेतात गहू, हरबरा, वाटाणे, ज्वारी, बाजरी, मूग, उडीद, चवळी, तांदूळ, भुईमूग, ऊस, कपाशी, कांदे, कोबी इत्यादी उत्पादन शेतात होते. काही वेळा शेतात भाजीपाला लावतात. भाजीपाला जळगाव व तालुक्याच्या ठिकाणी विकतात किंवा नाशिक, मुंबई व सुरत या गावांना मालट्रक भरून भाजीपाला विकतात. विशेष म्हणजे इतर व्यापारी व्यवसायात त्यांना फसविण्याचा प्रयत्न करतात. भाजीपाला, चवळी, मूग, उडीद, काकडी तसेच इतर फळे विकण्यासाठी बाजारात (शेजारच्या मोठ्या गावात किंवा तालुक्याच्या ठिकाणी) कोळी समाजाचे स्त्री–पुरुष (पती–पत्नी) जातात. काही विकायचे असेल तर बैलगाडी घेवूनच बाजाराच्या गावी जातात. पैशांचा व्यवहारसुद्धा स्त्रिया करतात. कोळी स्त्रिया अनुभवाने सर्वकाही शिकत आहेत. हळूहळू का होईना बाहेरच्या जगाशी त्यांचा संपक वाढत आहे. त्यामुळे त्यांच्यात परिवर्तन होत आहे.[13]

गावाकडील कोळी लोक शेतीबरोबर दुय्यम व्यवसायही करतात. गाई, म्हशी, शेळ्या, कोंबड्या पाळणे इत्यादी. शासनाने ज्या काही योजना राबविलेल्या आहेत त्याचा फायदा कोळी समुदायाने घेतलेला दिसून येतो. उदा. विहीरीसाठी शासकीय अनुदान, विद्युत मोटारी, इत्यादी योजनांचा फायदा, शेती व्यवसायात झाला. म्हणून ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली त्यांना त्याचा फायदा झालेला दिसून येतो.

थोडक्यात आर्थिक, वैवाहिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय इत्यादी बाबतीत जर विचार केला तर कोळी समुदायाचे जीवन खूप काही वेगळे आहे असे म्हणता येणार नाही. गावाकडील कोळी समुदायाचे जीवन शेतीव्यवसायावर आधारित आहे. तर जळगाव शहरातील कोळी समुदायाचे जीवन नोकरी, कामधंदा, व्यवसाय यावर आधारित आहे. मात्र स्त्रियांच्या जीवनमानात कमालीची तफावत दिसून येते.

ह्या समुदायाचे बरेचसे लोक अशिक्षित व अडाणी असल्यामुळे या समुदायात अनेक पारंपरिक रुढी आणि अंधश्रद्धा आढळून येतात. हा समुदाय सामाजिक चळवळींपासून बराच लांब आहे. तापी नदीत पारंपरिक मत्सव्यवसाय, नाव चालविणे, शेती, मजूरीत हा समुदाय गुंतलेला होता. हा समुदाय सामाजिक परिवर्तनाच्या किंवा इतर चळवळींपासून अलिप्त असल्याचे आढळते. सामाजिक अन्याय, अत्याचारासंबंधी संघर्षात्मक भूमिका न घेता, त्या परिस्थितीशी समायोजन साधण्याकडेच बहुतेक लोकांचा कल आढळून येतो. सामाजिक कार्यकर्त्यांचा या समुदायात अभाव जाणवतो. विशेषतः या समुदायात सामाजिक व राजकीय चळवळींच्या बाबतीत उदासिनता आढळून येते. तरुण वर्ग सामाजिक लढ्यामध्ये भाग घेतांना पाहिजे तसा दिसून येत नाही.

### संदर्भ :

1.कोळी संतोष पोलाद, मुलाखत, कठोरा, ता. यावल, जि. जळगाव, दि. 07 / 04 / 2016
2.सोनवणे मोतीलाल, खान्देशातील आदिवासी : कोळी जमातीचे अंतरंग, शहा प्रकाशन, शहादा, 2007, पृ. 166, 167
3.कोळी प्रकाश रामदास, मुलाखत, मुंगसे, ता. अमळनेर, जि. जळगाव. दि. 03 / 04 / 2016
4.जोशी पं. महादेवशास्त्री (संपा.), भारतीय संस्कृतिकोश, खंड दुसरा, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, चतुर्थ आवृत्ती, 20014, पृ. 590.
5.सपकाळे विठ्ठल एकनाथ, मुलाखत, हतनूर (भुसावळ जि. जळगाव) दि. 17 / 04 / 2016
6.सपकाळे उमेष विनोद, मुलाखत, जैनाबाद, (वाल्मीकीनगर), ता.जि.जळगाव. दि. 10 / 04 / 2016
7.शिरसाठ संजय भावसिंग, मुलाखत, नालखेडा, ता. अमळनेर, जि. जळगाव, दि. 03 / 04 / 2016
8.सपकाळे बाळू शंकर, मुलाखत, आसोदे ता. जि. जळगाव, दि. 10 / 04 / 2016
9.सैंदाणे भरत जगन्नाथ, मुलाखत, नांदेड, धरणगाव, दि. 17 / 04 / 2016
10.तायडे निलेश शंकर, मुलाखत, जळगाव, दि. 10 / 04 / 2016
11.शंकपाळ मोहनभाऊ वना, मुलाखत, जळगाव., दि. 10 / 04 / 2016
12.कोळी ईश्वर राघु, मुलाखत, जळोद, ता. अमळनेर, जि. जळगाव, दि. 03 / 04 / 2016
13.सोळंके जगन विश्वनाथ, मुलाखत, कोडन्हावी, ता. यावल, जि. जळगाव, दि. 17 / 04 / 2016

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

* International Scientific Journal Consortium
* OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org